# संत मन्मथस्वामी प्रवर्तित लिंगायत भक्ति चळवळ साहित्य योगदान

संशोधक विद्यार्थी
माधव दत्तात्रय मोरे
भाषा, साहित्य आणि संस्कृती अभ्यास संकुल
स्वा. रा. ती. म. नांदेड

लिंगायात भक्तिचळवळीची पार्श्वभूमी ही महाराष्ट्र आणि कर्नाटक या दोन राज्याच्या सिमेरेषेवर उदयास आली. 12 व्या शतकामध्ये जन्माला आलेले महात्मा बसवेश्वर यांनी अनुभव मंडपाच्या माध्यमातून ही लोकचळवळ उभी केली. महात्मा बसवेश्वरांचा जन्म इ. स. 1105 मध्ये अक्षय तृतीयला झाला कमेकुळ कालमुखी शैव असलेले संस्थानिक राजे मदिराज व मादलांबिका हे त्यांचे माता–पिता हो सध्याच्या कर्नाटक जिल्यातील विजापूर जिल्हयातील बागेवाडी हे त्यांचे जन्म ठिकाण त्यांनी वयाच्या आठव्यावर्षीच जानवे मुंज उपनयन संस्काराचा विरोध करतात पुढे चालून जात, वर्ग, वर्ण, पंचसुतक,उच्च–निच्च नाकारून इष्टलिंग गळयात देवून नवीन धर्मआंदोलन उभे करतात हाच तो लिंगायत धर्म, आष्ठावरण, पंचाचार, शष्ट्स्थल हे त्यांचे तत्वज्ञान.

" दगडाचा देव देव नव्हे
मातीचा देव देव नव्हे
सेतुबंध रामेश्वर, गोकर्ण काशी
केदार आणि इतर क्षत्री देव देव नव्हे
तुमच्या अंतर्यामीचा देव शोधा
तुम्हीच देव आहात"

देवा विषयक अतीशय प्रखर अशी भूमिका घवून महात्मा बसवेश्वर आपली भूमिका स्पष्ट करतात.

या चळवळीचा विस्तार तत्कालीन कल्यान नरेश बिज्जल यांच्या कार्यकाळास झाला लिंगायात धर्माने अनेक रूढी परंपरा नाकारल्याने हरळया या चांभार व मधुवास या ब्राम्हणणांच्या मुला मुलीचा विवाह अनुभव मंडपामध्ये लिंगदोक्षा देवून लावण्यात आला या जाती अंताच्या लढईचे रूपांतर कल्याण क्रांतीमध्ये झाले कल्याण नरेश बिज्जल याचा खुन करण्यात आला या घटनमुळे बसवेश्वरांनी देहत्याग केला पूढे ही चळवळ बसवेश्वरांचे भाच्चे यांच्या नेतृत्वाखाली विस्तारत जावून महाराष्टातील समाजजीवनावर प्रभावित झाली.

महाराष्ट्रामध्ये लोकांच्या मनावरच या चळवळीचा पगडा निर्माण झाला नाही तर अनेक लेखकांनी व संतांनी या नवोनजीवन तत्वाानाची मांडणी मराठी भाषेमध्ये करण्यात सरूवात केली. विसोबाखेचर रचित शष्ट्स्थळ हा एकमेव ग्रंथ यादवकाळात लिंगायत विचारांवर आधारित आहे. या नंतर शांतलिंग स्वामी यांनी करण्हसुगे आणि विवकचिंतामणी ही ग्रंथरचली 16 व्या शतकापासून लिंगायत संतपरपरेची एक फळी उभी झालेली दिसते. मन्मथ स्वामी, शिवदास, महादेवप्रभू, बसवराज, लक्ष्मण महाराज, गुरूदास, बसवदास,या संतांनी अभंग आणि ओवी या वाङ्मय प्रकारणातुन साहित्य निर्मीती केली. त्यांनी लिंगायात तत्वज्ञानाबरोबरच स्वनुभवाची ही मांडणी केली. त्यांच्या वाङ्मय निमीतीने मराठी भाषेवर एक वेगळा ठसा निर्माण केला.

मन्मथस्वामी : चरित्र व साहित्य निर्मिती :–

मन्मथ स्वामी यांचा जन्म मराठवाडयातील उस्मानाबाद जिल्यातील

कळंब या गावी शके 1482 माद्य शुध्द पंचमी इ.स. 1560 मध्ये झाला त्यांच्या मात पित्याचे नाव पार्वतीबाई आणि शिवलिंग स्वामी असे आहे. मन्मथ स्वामी यांचे शिवराज व मन्मथ असे दोन नाव आहेत पण स्वामींनी मन्मथ या नाममुदचा वापर आपल्या लिखानातून केला पण पुढोल संतानी त्यांच्या दोन्ही नावाचा उल्लेख लिखाणातुन केला उदा दाखल बसवलिंगाचा अभंग पाहता येईल मन्मथ शिवराज शिवयोगी साचार क्षेत्र कपिलाधार वास भूमीका

जन्मजात कविप्रतिभा लाभलेल्या स्वामींनी बालवयातच लावणी,कटाव, पदे फटका अशा काव्यप्रकार रचनेत प्राविण्या मिळाले याच काळात माणुर मठाधिपती विरूपाक्ष स्वामीचे उत्तराधिकारी बसवराजस्वामी, शिव्यसंप्रदाय असणाऱ्या नेकनुर ला आले तेव्हा पार्वतीबाई व मन्मथस्वामी यांच्याशी भेट झाली. मन्मथाची जन्मजात लाभलेली काव्यप्रतिभा पाहून मन्मथ स्वामीला पुढील शिक्षणासाठी मानुर येथील मठामध्ये आणले मन्मथ स्वामीची गुरूवर अपार श्रध्दा होती ते म्हणतात.

या लागी शिव तो नागेश्वरू ।
तेची बसवेश्वरांची श्रीगुरू ।।
मानुरपट सिंव्हासनी अधिकारू।
असे जयासी ।।
त्याचेचे कृपेकरोण । परमरहस्याची टीका
वीस्तारून करविते झाले आपण ।
बसवराज स्वामी ।।

मानुरमठाचे मुळ पुरूष नागनाथ यांना स्वामीचे गुरूस्थानी मानले असून बसवराजस्वामी हे दिद्दागुरू ठरतात हे स्वामींच्या रचणेवरून ठरते. गुरूवर अपार श्रध्दा आसलेल्या स्वामीना केले याच बरोबर शिवागम, सिध्दांत शिखामणी या ग्रंथाचेही सम्यक अध्ययन केले. विद्याभ्यास पुर्ण झाल्याने गुरू आज्ञा घेवून स्वामी मातापित्याच्या दर्शनासाठी नेकनुर ला आले काहीकाळ त्यांनी घालवला याच दरम्या स्वामीचे पीता शिवलिंग स्वामी शिवैक्य झाले स्वामीच्या संवेदनशिल मनावर परिणाम झाला गुरू उपदेशाची जानठेवून त्यांनी तिर्थयात्रा व धर्मप्रचाराच्या कार्यासाठी ग्रहत्याग केला. याच काळात त्यांनी साहित्य निर्मिती केली. स्वामी आपल्या शिष्याबरोबर यात्रा करीत असतांना स्वतःचे साहित्य निर्माण केले असे वर्णन त्यांच्या विषयी प्रचलित असलेल्या एका कथेत केले आहे पंचतेपरार्धपंचमहा पद्या अभंग समुद्र रचियेला असे वर्णन शिवगुरूदास नावाच्या शिष्याने केले आहे मन्मथस्वामीच्या नावावर डॉ. रा. चि. ढरे श्रीयुत ग.च. चौधरी, डॉ शिवलिंग शिवाचार्य महाराज यांनी आपल्या लिखाणातून मन्मथ स्वामीच्या लिखानाची यादी दिली आहे, ती पुढील प्रमाणे. परमरहस्य, अनुभवानंद ज्ञानबोध, आनंदलहरी मन्मथबोधाम्रत अभंग, स्वयंप्रकाश, गुरूचरित्र, शिवस्त्रोत गुरूगिता, गुरूस्त्रोत, गुरूनागा, विज्ञानबोध, पंचपदी, शिवगीता या व्यतीरिक्त रूद्राक्ष, गुरूमंत्र, पदे लावण्या, भारूडे, दिंडी, विभूती इ. मन्मथस्वामीच्या साहित्य निर्मीती विषयी डॉ सुधाकर मोगलेवार म्हणतात मन्मथ स्वामी लिंगायात वीरशैव वाङ्मय इतिहास जगातातील तुकाराम आहेत कारण या वाङ्मयात कळस चढवण्याचे कार्य मराठी भाषेमध्ये मन्मथ स्वामीनी केले आहे मन्मथ स्वामी यांचे शिवैक्य इस 1615 मध्य झाले त्यांची संजीवनी समाधी कपिलाधार जि. बीड येथे आहे.

भक्तिचळवळ स्वरूप व योगदान :–

महाराष्ट्रामध्ये हा कालखंड शिवधर्मापूर्वीचा होता तेव्हापासून प्रबोधनाच्या कालखंडापर्यंत लिंगायत संतांनी आपले लिखानाचे कार्यकेले बसवेश्वरांच्या क्रांतीमुळे

मिळालेले नविन अशी स्वातंत्र्य, समता,बंधूभाव ही मुल्य त्यांनी जोपासली या संतानो स्वधर्मीयांचा दुसऱ्या धर्मात जाण्यास विरोध केला असला तरीही दुसऱ्या धर्माचा अनादर केलेला कुठे त्यांच्या साहित्यात पहावयास मिळत नाही. अतिशयअसहिष्णू काळामध्ये मानवीमुल्यांची मांडणी करणे गरजेचे होते हे अतिशय महत्वाचे कार्य स्वामीनी केले आहे पंचसुतक नाकारून लिंगायात तत्वज्ञान त्यांनी मांडले वैदिक परंपरेचा विरोध करणे आणि त्याच बरोबर यवनी संताचा काळ अशा बिकट परिस्थिती मध्ये अभंग, ओवी, भारूड, आरत्या इ वाङ्मय प्रकाराचा वापर करून सर्वसामांन्यामध्ये आत्मविश्वास, धार्मिक स्वातत्र्य, बधुप्रेम, या मुल्याची रूजवणूक करणे हे अतीशय बिकट काम स्वामीनी केलेले आहे

हे मानवतावादी कार्य करण्यासाठी स्वामीनी लिंगायत भक्ती चळवळ चालवली व मानवतावादावर आधारित मुल्यांचा समाजात रूजवण्याचा प्रयत्न केला.

संदर्भ ग्रंथ :–

1. कृष्णा मेणसे श्री बसवेश्वर ते श्री ज्ञानेवश्वर एक चिंतन, प्रकाशन विलासराव लोकवाङमय गृह, भूपेश गुप्ता भवन 85 सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई
2. प्रा.राजशेखर मकरडीगुद्दी लिंगायत तत्वज्ञान व आचरण महराष्ट्र बसव परिषद हिरमंठ संस्थान, भालकी.
3. डॉ.शे.दे.पसारकर मन्मथस्वामी यांच्या परमरहस्य या ग्रंथाचा सर्वांगिन चिकित्सक अभ्यास, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.
4. डॉ. र. बा. मंचरकर संपा वीरशैव संप्रदाय सप्टे 1989
5. डॉ शिवलिंग शिवाचार्य संपा सार्थ परमरहस्य संस्कृती प्रकाशन राजूर, अहमदपूर.